सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३३ | मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. सचिन बेहेरे
आमदारांचे स्वीय सहाय्यक



श्री. निनाद शिसोदे
जिल्हा उपाध्यक्ष, रा. यु. कॉ., जळगाव



श्री. जगदीश चौधरी
अध्यक्ष, एम. आय. डी. सी.



प्रा. श्री. मनोहर सूर्यवंशी
सेवा निवृत्त प्राध्यापक, प्रताप महाविद्यालय, अमळनेर



श्री. मिहीर पवार
बिल्डर व आयएफबी प्रॉडक्ट्स् डिस्ट्रीब्युटर, अमळनेर



अमळनेर : शहरातील विविध भागातील रस्त्यावर वावरणारे मनोरुग्ण.

# मनोरूग्ण अन् समाजाची हरवलेली संवेदना

## प्रशासन, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेणे गरजेचे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा : रजनीकांत पाटील**

**अमळनेर : विविध भागात फिरणारे मनोरूग्ण चिंतेचा विषय आहे. मात्र, यास समाजाची हरविलेली संवेदनाही तितकीच जबाबदार वाटते. तेही माणसेच असून, त्यांना आधाराची गरज आहे. त्यांच्यावर वैद्यकीय उपचार व पुनर्वसनाची गर आहे. यासाठी प्रशासन, सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेण्याची गरज आहे. येथील पैलाड भाग, दगडी दरवाजा, भाजीपाला मार्केट, मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर, रेल्वे स्टेशन रोड, धार्मिक स्थळे आणि मुख्य रस्त्यांवर फिरणाऱ्या मनोरुग्ण महिला व पुरुषांचे वर्तन आता नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनले आहे. ही केवळ दृश्यांची सवय नव्हे, तर वाढती अस्वस्थता आहे.**

भर चौकात रस्त्याच्या मधोमध साडी काढून बसणाऱ्या महिला, स्वत:चे केस ओढत वेदनेने किंचाळणारे चेहरे, अचानक आरडाओरड करणारी माणसे हे सगळे दृश्य पाहताना क्षणभर माणूस थबकतो. काही ठिकाणी विवस्त्र अवस्थेत फिरणारे, अश्लील आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करणारे मनोरुग्ण पुरुष, बाजारपेठेत, रस्त्यावर आणि बसस्थानक परिसरात मोकाट फिरताना आढळून येतात. काही रस्त्याच्या मधोमध जाऊन उभे राहतात बसतात, झोपूनही राहतात. काही हातात कागद-पेन घेऊन स्वत:शीच लिहीत-बोलत रस्त्यावर फिरतात, तर काहीजण चालणाऱ्या नागरिकांच्या पाठीमागे अचानक धावत सुटतात. या प्रकारांमुळे महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांमध्ये सतत भीतीची भावना निर्माण होत आहे.

### मनोरुग्णांना आधार, मायेची गरज

काही मनोरुग्ण नामांकित धार्मिक स्थळांमध्ये जाऊन गोंधळ घालतात, वस्तू उचलून नेतात पळ काढतात, भाविकांना अश्लील भाषेत शिवीगाळ करतात. काही जण रस्त्यावर जोरजोरात ओरडत चालतात. या घटनांमुळे धार्मिक भावना दुखावल्या जात असताना सार्वजनिक शांततेलाही धोका निर्माण होत आहे.

या सगळ्यात अधिक वेदनादायी बाब म्हणजे, यातील अनेक मनोरुग्ण हे भिकारी नसून सुस्थित, प्रतिष्ठित किंवा भरदार कुटुंबातील असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, मानसिक आजारामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. काही वेळा कुटुंबीयांना माहिती देऊनही त्यांच्याकडून जबाबदारी स्वीकारली जात नाही. काही मनोरुग्ण बाहेरगावाहून येऊन शहरात मोकाट फिरत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे शहर हळूहळू अशा असहाय्य जीवांसाठी उघड्या रस्त्यावरील आश्रयस्थान बनत चालले आहे. ही परिस्थिती केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून ती समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे. हे मनोरुग्ण गुन्हेगार नाहीत, तर उपचारांची, आधाराची आणि मायेची गरज असलेली माणसे आहेत. त्यांच्याकडे केवळ 'धोका' म्हणून पाहणे अन्यायकारक ठरेल. मात्र त्याच वेळी सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेकडेही दुर्लक्ष करता येणार नाही.

### वेदनांकडे डोळेझाक नको

त्यामुळे नगरपालिका, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग आणि समाजकल्याण विभागाने संयुक्तपणे तातडीने पुढाकार घेणे अत्यावश्यक झाले आहे. अशा व्यक्तींची ओळख पटवून त्यांची वैद्यकीय तपासणी, मानसिक उपचार, समुपदेशन, तसेच आवश्यक असल्यास पुनर्वसन केंद्रात दाखल करण्याची ठोस व्यवस्था करणे गरजेचे आहे. कुटुंबीयांची जबाबदारी निश्चित करून त्यांनाही या प्रक्रियेत सहभागी करून घेणे काळाची गरज आहे. शहर स्वच्छ, सुरक्षित आणि सुसंस्कृत ठेवायचे असेल, तर रस्त्यावर दिसणाऱ्या वेदनांकडे डोळेझाक करून चालणार नाही. रस्त्यावर भटकणारी ही माणसे आपल्या समाजाचाच आरसा आहेत. आज त्यांच्या वेदना दुर्लक्षित केल्या, तर उद्या त्याची किंमत संपूर्ण शहराला मोजावी लागू शकते. भीतीपेक्षा माणुसकी मोठी ठरावीहीच आजच्या अमळनेरची खरी गरज आहे.



अमळनेर : मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन देताना अमर सोनार, राकेश शेटे, पंकज भोई, उज्वल पाटील, पारस धाप, अभिषेक सोनार आदी.

# नाट्यगृहाची साजवट, विद्युतरोषणाई करावी

## शिवजयंती उत्सव समितीतर्फे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येत्या १९ फेब्रुवारीला होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाची सजावट व विद्युत रोषणाई करावी, अशी मागणी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीने केली आहे. याबाबत मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की शिवजयंतीनिमित्त विविध भव्य कार्यक्रम, मिरवणूक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. यासाठी तालुक्यातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने दर्शनासाठी व कार्यक्रमास उपस्थित राहतात. यासाठी शहरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात यावे. नाट्यगृहाची आकर्षक सजावट करण्यात यावी. संपूर्ण परिसर विद्युत रोषणाईने प्रकाशनमान करावा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पॉलिशिंग करण्यात यावी. यातून नावलौकिक वाढेल व शिवजयंती उत्सव अधिक दिमाखात साजरा करता येईल.

यावेळी अमर सोनार, राकेश शेटे, पंकज भोई, उज्ज्वल पाटील, पारस धाप, अभिषेक सोनार, गोकुळ पाटील, आशिष अंधारे, राहुल अहिरे, शुभम पाटील, मोहित पाटील, मनोज शिंगाणे आदींसह सार्वजनिक शिवजयंती समिती समितीचे सदस्य उपस्थित होते.

# (स्व.) अजितदादा पवार यांचे आज अस्थिकलश दर्शन

## पाडळसे धरणावर होणार विधिवत अस्थी विसर्जन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व जनसेवेचे व्रत जीवनभर जपणारे (स्व.) उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अस्थिकलश दर्शन व अस्थी विसर्जन मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी अमळनेर येथे होणार आहे. येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात दुपारी ३ ते ४ या वेळेत (स्व.) अजितदादा पवार यांच्या पवित्र अस्थिकलशाचे दर्शन नागरिकांसाठी खुले ठेवण्यात येणार आहे.

या वेळी पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण करतील. त्यानंतर अस्थिकलश रथयात्रा अमळनेर, धार, मारवड, कळमसरे, पाडळसरे मार्गे पाडळसरे धरण येथे नेण्यात येईल. तेथे विधिवत अस्थी विसर्जन करण्यात येणार आहे. जनतेच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करणारे, लढाऊ नेतृत्व व विचारधारेचा वारसा देणारे (स्व.) अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देणारा हा कार्यक्रम आहे. हा शोकाकुल कार्यक्रम अमळनेर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जलशुद्धीकरण प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना सुरक्षा कवच

## नगराध्यक्षक्ष डॉ. बाविस्करांची तत्परता; सेफ्टी इक्विपमेंटचे वितरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अंबऋषी टेकडी जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही मार्गी लागला आहे. प्रलंबित असलेली सुरक्षा साहित्याची मागणी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या तत्परतेमुळे पूर्ण झाली आहे. त्यांनी स्वत: पुढाकार घेत कर्मचाऱ्यांना हे सुरक्षा साहित्य सुपूर्द केले. अंबऋषी टेकडी जलशुद्धीकरण केंद्र हे शहराच्या पाणीपुरवठ्यातील अत्यंत महत्त्वाचे आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने काही साहित्याची (सेफ्टी इक्विटमेंट) तातडीने गरज होती. मात्र, गेल्या अनेक वर्षापासून हा विषय प्रलंबित होता. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यानंतर त्यांनी तातडीने हे काम पूर्णत्वास नेले. निर्णय अन् अंमलबजावणी नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांनी या विषय प्राधान्याने घेतला. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना माहिती देवून यावर तातडीने कार्यवाही करण्याचे ादेश दिले.

पान २ वर

## दिनविशेष
०३ फेब्रुवारी

- राष्ट्रीय महिला चिकित्सक दिन
- राष्ट्रीय बेपत्ता व्यक्ती दिन
- भारतातील पहिली इलेक्ट्रिक रेल्वे लाईन व्हिक्टोरिया टर्मिनस ते कुर्ला पर्यंत धावली.
- सायमन गो बॅकने मुंबईत सायमन कमिशनचा निषेध केला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

# पिंपरी- चिंचवडमध्ये होणार अजितदादांचे भव्य स्मारक

## भाजपचे आमदार महेश लांडगे यांची आयुक्तांकडे मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे लोकनेते, दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ पिंपरी- चिंचवड नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजप नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पिंपरी- चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डिकर यांना निवेदन दिले आहे. चिंचवड येथील डी- मार्टसमोरील ३३. ८६ एकर जागेत उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय संकुलात सुमारे ८. ६५ एकर क्षेत्रावर मुख्य इमारतीचे काम सुरू आहे. भविष्यात महापालिकेचे संपूर्ण प्रशासकीय कामकाज याच ठिकाणाहून चालणार आहे. या पार्श्वभूमीवर, या इमारतीच्या आवारातच दिवंगत अजितदादांचा पूर्णाकृती ब्राँझ पुतळा असलेले स्मारक उभारण्यात येणार आहे.

आमदार लांडगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की दिवंगत अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या सर्वांगीन विकासाला गती दिली. पायाभूत सुविधा, नागरी सेवा, प्रशासकीय निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख धोरणांमुळे राज्याला वेगळी ओळख मिळाली. असे नेतृत्व अकाली काळाच्या पडद्याआड जाणे ही महाराष्ट्राची मोठी हानी आहे. त्यांच्या कार्याची जपणूक होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे नवनिर्वाचित नगरसेवकांच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत अजितदादांच्या स्मारकाचा प्रस्ताव मंजूर करून पिंपरी- चिंचवडकरांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात यावी. यासाठी आम्ही आग्रही आहोत. तत्पूर्वी जुन्या महापालिका सभागृहात अजितदादांचे तैलचित्र तातडीने बसवण्यात यावे, अशी सूचना प्रशासनाला केली आहे. महाराष्ट्राच्या विकासाची "अजित सृष्टी" नवीन प्रशासकीय इमारतीतील सभागृहाला 'अजितदादा पवार सभागृह' असे नाव देण्यात यावे आणि शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा विकास प्रवास, तसेच भविष्यातील नियोजन अधोरेखित करणारी 'पिंपरी-चिंचवड अजित सृष्टी' उभारण्यात यावी, अशी संकल्पना आहे. शहराला विकासामध्ये एक नंबर बनविण्याचे स्वप्न अजितदादांनी पाहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. हे स्मारक भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देणारे ठरेल आणि हिच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा विश्वास यावेळी आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

"महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत प्रत्येक टप्प्यावर अजितदादा पवार यांचे दूरदृष्टीचे नेतृत्व लाभले. त्यांच्या कार्याची आणि विचारांची जपणूक होणे ही केवळ भावना नाही, तर आम्हा पिंपरी-चिंचवडकरांची जबाबदारी आहे. नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात उभारण्यात येणारे स्मारक, सभागृहाला दिले जाणारे त्यांचे नाव आणि 'अजित सृष्टी' ही संकल्पना भविष्यातील पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देईल. याबाबत महापालिका प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. त्यासाठी आम्ही सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत, अ आमदार लांडगे यांनी म्हटलं आहे.




संपादकीय

# विकास आराखडा की संधीची कसोटी ?

भारताच्या इतिहासातील पहिलाच रविवारी सादर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांची मांडणी नसून, भारताच्या पुढील आर्थिक वाटचालीचा स्पष्ट संकेत देणारा दस्तऐवज आहे. जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत विकासाला चालना देणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि वित्तीय शिस्त राखणे या तिन्ही बाबींचा समतोल साधण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात दिसून येतो. अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू म्हणजे पायाभूत सुविधांवरील भरीव गुंतवणूक. रस्ते, रेल्वे, दळणवळण, लॉजिस्टिक्स आणि शहरी विकासासाठी वाढविण्यात आलेला भांडवली खर्च हा रोजगारनिर्मितीचा आणि उत्पादनक्षमतावाढीचा महत्त्वाचा आधार ठरू शकतो. पायाभूत सुविधांवरचा भर हा केवळ वर्तमानातील रोजगारापुरता मर्यादित नसून भविष्यातील आर्थिक गती ठरवणारा घटक आहे. उद्योग व उत्पादन क्षेत्रासाठी 'मेक इन इंडिया'ला नवे परिमाण देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात जाणवतो.

उच्च तंत्रज्ञान, औषधनिर्मिती, सेमी कंडक्टर, दुर्मिळ खनिजे यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून भारताला आयात–निर्भरतेतून मुक्त करण्याची दिशा स्पष्ट होते. दीर्घकालीन दृष्टीने हे पाऊल भारताला जागतिक उत्पादन साखळीत अधिक सक्षम स्थान मिळवून देणारे ठरू शकते. कररचनेत मोठ्या क्रांतिकारक घोषणा नसल्या, तरी कर प्रणाली अधिक सुलभ व विश्वासार्ह करण्याचा प्रयत्न दिसतो. करदात्यांवरील अनावश्यक ताण कमी करून गुंतवणूक–अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा संदेश सरकारने दिला आहे. मात्र, मध्यमवर्गाला थेट दिलासा देणाऱ्या अपेक्षा काही अंशी अपूर्ण राहिल्याची भावना नाकारता येणार नाही. या अर्थसंकल्पातील महत्त्वाचा सकारात्मक मुद्दा म्हणजे वित्तीय शिस्तीवर ठेवलेला भर. तुटीचे प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचा निर्धार भविष्यातील आर्थिक स्थैर्यासाठी आवश्यक आहे. विकास आणि कर्जभार यामधील संतुलन राखण्याचा हा प्रयत्न स्वागतार्ह आहे.

तथापि, या अर्थसंकल्पाच्या यशाचे खरे मोजमाप आकड्यांत नव्हे, तर अंमलबजावणीत आहे. मोठ्या घोषणा आणि तरतुदी प्रभावीपणे जमिनीवर उतरल्या तरच अपेक्षित रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि समावेशक विकास साध्य होऊ शकेल. जागतिक आर्थिक घडामोडी, निर्यात क्षेत्रावरील दबाव आणि महागाईसारखी आव्हाने ही अजूनही सरकारसमोरची कसोटीच आहेत. एकूणच हा केंद्रीय अर्थसंकल्प दीर्घकालीन विकासाचा आराखडा मांडणारा आहे. मात्र त्याची फलश्रुती सरकारच्या कार्यक्षम अंमलबजावणीवर आणि धोरणात्मक सातत्यावर अवलंबून राहणार आहे. संधी तर उपलब्ध झाली आहे, आता ती कितपत साध्य होते हे येणारा काळच ठरवेल, एवढे निश्चित!



अमळनेर : प्रताप महाविद्यालयात गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या ग्रामसंवाद सायकल यात्रेतील सायकल पटूंसमवेत गिरीश कुळकर्णी, प्र. प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव व प्राध्यापक आदी.

# महात्मा गांधी म्हणजे शाश्वत विचार– गिरीश कुळकर्णी

## प्रताप महाविद्यालयात गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या ग्रामसंवाद सायकल यात्रेचे स्वागत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव येथील गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे महात्मा गांधी स्मृतीदिनानिमित्त ग्रामसंवाद सायकल यात्रेस प्रारंभ झाला आहे. या उपक्रमांतर्गत येथील प्रताप महाविद्यालयात रविवार, दि. २ फेब्रुवारी येथिल पूज्य साने गुरुजी सभागृहात सकाळी ८ ते ९ या वेळात प्रबोधनपर कार्यक्रम झाला. यावेळी समन्वयक गिरीश कुलकर्णी यांनी महात्मा गांधीजी म्हणजे शाश्वत विचार आहेत. त्यांच्या विचार विद्यार्थ्यांनी अंगिकरावे, असे आवाहन केले.

जनजागृती प्रबोधन पथनाट्य 'आवो लकीरे मिटा दे' आपल्या मनातील भेद, द्वेष दूर करून गांधींच्या समतावादी भारत निर्माण करण्याचा हेतू या कार्यक्रमाचा आहे. या उपक्रमात विविध राज्यांतील ३२ जणांची टीम या ठिकाणी आली होती. त्यांनी पथनाट्यद्वारे स्वच्छता, मनातील द्वेष दूर करणे, बापूजी का एक ही सपना स्वच्छ भारत अपना, मानवी मूल्य संवर्धन, नैतिकता, कोणतेही काम उच्च–निच्च नाही, हक्क–अधिकार,समानतेची गरज, जातीवाद निर्मूलन, संप्रदाय एकता, भविष्यातील भारत कसा राहिले पाहिजे, मानवता सर्वात मोठा धर्म, चरित्र की सिडी हे सदाचरण आहे, दुसऱ्याची सेवा हीच खरी पूजा आहे, नम्रता, आत्मविश्वास, अशा स्वरूपाचे प्रबोधनात्मक पथनाट्य सादर केले.

सर्वात शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी समानतेची प्रतिज्ञा घेतली. पूज्य साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकाचे तामिळमध्ये भाषातंरीत करण्याचे कार्य फारुखजी यांनी केले. त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी एनसीसी, राष्ट्रीय सेवा योजना, हॉस्टेलच्या विद्यार्थिनी, सीसीएमसी व वाणिज्य विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. विजय तुंटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. हेमंत पवार यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, डॉ. विजय तुंटे, डॉ. संदीप नेरकर, डॉ. हेमंत पवार, डॉ. बालाजी कांबळे, डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. सचिन पाटील, डॉ. प्रियांका पाटील, प्रा. अमोल अहिरे, दिलीप शिरसाठ, पराग रवींद्र पाटील, अतुल धनगर, विशाल अहिरे यांनी सहकार्य केले.

# महिलांचा सर्वसमावेशक विकास महत्वाचा

## प्रा. इशिता घोष; रूक्मिणीताई महाविद्यालयात चर्चासत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विविध क्षेत्रात महिला प्रगतीपथावर आहेत. मात्र, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर सुद्धा 'महिला सबलीकरण' म्हणावे तितके यशस्वी झाले असे म्हणता येत नाही. महिलांचा सर्वसमावेशक विकास होणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन प्रताप महाविद्यालयातील पदार्थशास्त्र विभागातील प्रा. इशिता घोष यांनी केले.

येथील रुक्मिणीताई वाणिज्य आणि कला महाविद्यालयात 'महिला सबलीकरण' या विषयावर नुकत्याच झालेल्या चर्चासत्रात त्या बोलत होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य एस. जे. शेख अध्यक्षस्थानी होते.



अमळनेर : महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. इशिता घोष. समोर उपस्थित विद्यार्थिनी.

प्रा. घोष पुढे म्हणाल्या, की विविध क्षेत्रात महिला सबलीकरणाची गरज निर्माण झाली आहे. भारतात महिलांना सेवाक्षेत्र, असंघटित कामाचे ठिकाण अशा क्षेत्रात दिले जाणारे मानधन, वेतन व मोबदला हे आजच्या स्थितीला अल्प ओ. त्यामुळे एका प्रकारची असमानता निदर्शनास येते. विविध क्षेत्रात महिला आधारस्तंभ असल्या तरी त्यांच्या परिश्रमाच्या कथा आपण अभ्यासत असतो. त्यांना आजही अनेक ठिकाणी संघर्ष करावा लागतो. अनेक घटनेला सामोरे जावे लागते. म्हणून शासनाने महिलांचा सर्वसमावेशक विकास कसा होईल ? याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शासनाने त्यांच्या साक्षरतेचा दर हा वृद्धिगत केला पाहिजे. राज्य व केंद्र स्तरावर शिष्यवृत्ती वाढीसंबंधी सकारात्मक चर्चा केली पाहिजे. मानव म्हणून महिलांचा सन्मान, त्यांची प्रतिष्ठा कायम राखण्याची नैतिक जबाबदारी सर्वसामान्य नागरिकांची आहे. त्यांच्या सर्व समावेशक सहभाग व समतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहणे विकासाच्या संदर्भात महत्त्वाचे आहे. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# प्रताप महाविद्यालयात सामान्यज्ञान परीक्षेत १३५ विद्यार्थ्यांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथिल प्रताप महाविद्यालयांतर्गत करिअर कौन्सिलिंग सेंटरतर्फे प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर सामान्यज्ञान परीक्षा घेण्यात आल्या. सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा ते बारा दरम्यान घेण्यात आली. १३५ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. यशस्वी विद्यार्थ्यांना लवकरच एका समारंभात बक्षीस प्रदान करण्यात येईल.

प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांनी मार्गदर्शन केले. करिअर कौन्सिलिंग सेंटरचे प्रमुख डॉ. विजय तुंटे, डॉ. धिरज वैष्णव, डॉ. आर. सी. सरवदे, डॉ. माधव भुसनर, डॉ. धनंजय चौधरी, डॉ. रवी बाळसकर, डॉ. विवेक बडगुजर, डॉ. अमित पाटील, ग्रंथपाल दीपक पाटील, डॉ. बालाजी कांबळे, दिलीप शिरसाठ, पराग पाटील, प्रा. हिमांशू गोसावी, प्रा. अमोल अहिरे, विशाल अहिरे, डॉ. हर्ष नेतकर, डॉ. राखी घरटे, प्रा. मनिषा पारधी, सुरेश सोनवणे आदींनी सहकार्य केले.



अमळनेर : जलशुद्धीकरण प्रकल्पातील कर्मचाऱ्यास सुरक्षेचे साहित्य देताना नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर.

# जलशुद्धीकरण प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना सुरक्षा कवच

**पान १ वरून**

मुख्याधिकारी शिंदे यांनी संबंधित मक्तेदारास सूचना देवून अल्पावधीत सर्व साहित्य उपलब्ध करून दिले.

**'हे' आहे साहित्य :** जलशुद्धीकरण प्रकल्पावर कर्मचाऱ्यांना जीव धोक्यात घालून काम करावे लागू नये, यासाठी विविध प्रकारचे साहित्य देण्यात आले. यात उंचावर काम करण्यासाठी संरक्षण म्हणून सेफ्टी हार्नेस, पाण्यात बुडू नये यासाठी लाईफ जॅकेट व लाईफ रिंग, बचाव कार्यासाठी रबरी ट्यूब, आपत्कालीन परिस्थितीसाठी ॲल्युमिनियमच्या २० फूट व १५ फूट लांबीच्या मजबूत शिड्या, टॉर्च आदी साहित्य डॉ. बाविस्कर यांनी स्वतः जलशुद्धीकरण केंद्रावर जाऊन फिल्टर इन्स्पेक्टर गणेश शिंगारे यांच्याकडे सुपूर्द केले. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.


**साहित्य वितरणास मान्यवरांची उपस्थिती**

साहित्य वितरणप्रसंगी उपनगराध्यक्ष प्रशांत निकम आणि पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील हे देखील उपस्थित होते. त्यांनी जलशुद्धीकरण केंद्रातील दुरुस्ती कामे आणि पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

# अनोखी गुरव हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात प्रथम

## (स्व.) वसंतराव गुरवांचा जोपासतेय वारसा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर: ज्यांनी संपुर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध शहनाई वादक म्हणून नावलौकिक मिळविला ते (स्व.) वसंतराव गुरव यांची नात व ज्यांनी वडिलांचा शहनाई वादनाचा वारसा पुढे नेला ते प्रसिद्ध कलाकार प्रबल उर्फ चिमू गुरव यांची सुकन्या कु. अनोखी प्रबल गुरव हिने आजोबा व वडिलांचा वारसा जपत संगीत क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

तिने अखिल भारतीय गांधर्व संगीत महाविद्यालयातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या " हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत (गायन) या विषयात मुंबई केंद्रातून प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला आहे. या कठीण परीक्षेत तिने सभागायनात " शुद्ध कल्याण " हा राग प्रस्तुत केला. उपशास्त्रीय प्रकारात ठुमरी सादर करून परीक्षकांना मंत्रमुग्ध केले. तिने वयाच्या अवघ्या सातव्या वर्षापासून या परिक्षा देण्याची सुरुवात केली होती. पूर्व प्राथमिक ते विशारद अशा ८ स्तरांच्या परिक्षेत तिने सलग विशेष योग्यता मिळविली आहे. गेल्या डिसेंबर २०२५ मध्ये वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी संगीत विशारद होवून तीने नावलौकिक प्राप्त केला आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. याचे श्रेय तिने आपल्या गुरूंना व आपल्या आई– वडील व कुटुंबाला दिले आहे.



अमळनेर : संत शिरोमणी श्री रविदास महाराज जयंतीनिमित्त पालखीचे दर्शन घेताना नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर.

मुंदडा नगर २ मध्ये उद्यापासून

# सोमेश्वर महादेव मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मुंदडानगर दोन भागात सोमेश्वर महादेव मंदिराचा भव्य प्राणप्रतिष्ठेचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. बुधवार, दि. ४ जानेवारी ते शुक्रवार दि. ६ जानेवारी दरम्यान हा सोहळा होईल. प. पू. ह. भ. प. १००८ श्री संत ईश्वरदास महाराज व गोविंद महाराज यांच्या हस्ते ही प्राणप्रतिष्ठा होणार आहे. मुख्य आचार्य म्हणून वै.शा.सं.श्री. अभयशास्त्री जोशी, मुंदडा बिल्डर्सचे संचालक ओमप्रकाश मुंदडा प्रमुख अतिथी असतील. बुधवारी श्री स्वामी समर्थ मंदिरापासून ते मुंदडा नगर २ पर्यंत शोभायात्रा निघेल. त्यानंतर पूजाविधी होतील. शुक्रवारी महाप्रसाद वाटप होईल.

# चिमणपुरी– पिंपळेत 'प्रताप'चे 'रासेयो' श्रमसंस्कार शिबिर

## गावात सामाजिक उपक्रम, श्रमदानात १३० स्वयंसेवकांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर शनिवार, दि. २४ जानेवारी ते शुक्रवार, दि. ३० जानेवारी तालुक्यातील चिपणपुरी– पिंपळे येथे पार पडले. शिबिराचा समारोप श्री दत्त मंदिर सभागृहात झाला. रासेयो स्वयंसविकांनी श्रमदान करून सामाजिक योगदान दिले.

समारोपास प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एच. डी. जाधव अध्यक्षस्थानी होते. खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील, प्रा. डॉ. संदीप नेरकर (सिनेट सदस्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), निंबा दला चौधरी (अध्यक्ष, दत्त मंदिर प्रतिष्ठान), ग्रामपंचायत सदस्य युवराज पाटील, संतोष चौधरी प्रमुख पाहुणे होते.

विशेष श्रमसंस्कार शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता अभियान, मतदान जनजागृती, आरोग्य जनजागृती, वृक्षारोपणासाठी खड्डे तयार करणे, वृक्षलागवड आदी विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. प्रा. डॉ. हेमंत पवार यांनी अहवाल वाचन केले. प्रा. सुनील एम. राजपूत यांनी सूत्रसंचालन केले. महिला कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. वैशाली राठोड यांनी आभार मानले. या शिबिरात एकूण १३० स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमामुळे युवकांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सेवाभाव व सामाजिक जाणीव अधिक दृढ झाल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

# रोटरी क्लबतर्फे शुक्रवारी कर्करोग निदान शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रोटरी क्लबतर्फे गर्भाशय व स्तन कर्करोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत येथील गणेश हॉस्पिटल येथे हे शिबिर होईल.

महिलांमध्ये वाढत असलेल्या गर्भाशय व स्तन कर्करोगाच्या आजाराबाबत जनजागृती होऊन वेळेत निदान व्हावे, हा या शिबिराचा उद्देश आहे. या शिबिरात ३५ ते ६० वयोगटातील महिलांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, डॉ. प्रसन्न जोशी (गणेश हॉस्पिटल, अमळनेर) हे तपासणी करतील. शिबिरात स्तनांची सविस्तर तपासणी, गर्भाशयाच्या कर्करोगासाठी पॅपस्मिअर तपासणी तसेच स्तन कर्करोगासाठी मॅमोग्राफी तपासणी व स्वतः स्तन तपासणीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तपासणीसाठी नाव नोंदणी आवश्यक असून, प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्राथमिक वैद्यकीय तपासणीनंतर आवश्यकतेनुसार मॅमोग्राफी किंवा पॅपस्मिअर तपासणी करण्यात येईल. साधारण ३ हजार ५०० ते ४ हजार रुपये खर्च येणाऱ्या या दोन्ही तपासण्या रोटरी क्लबच्या माध्यमातून मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लबतर्फे करण्यात आले आहे. नाव नोंदणीसाठी रोहित सिंघवी (९४२२५४००१३), राजेश जैन (९४२३४८९१४६), पूनम कोचर (९८९०१८५७८५ ) व अविनाश अमृतकर (९४२२४७८८२१ ) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com




# कॉलेज ड्रॉपआऊटने शून्यातून उभा केला सात कोटींचा झेंडू व्यवसाय!

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पश्चिम बंगालमधील कोलाघाटचे झेंडू उत्पादक अरुप कुमार घोष यांची यशोगाथा अनेक शेतकरी तरुणांसाठी प्रेरणादायी अन् मार्गदर्शक आहे. ते एखाद्या दुकानात कामगार म्हणून सहज राहू शकलो असते, पण अंगात भिनलेली उद्योजकता आणि शेतीमध्ये उडी घेतल्याने फुलशेतीबद्दलची त्यांची समज वाढली. त्यातून त्यांनी त्याच क्षेत्रात व्यवसाय सुरू केला अन् यशस्वी करून दाखवला.

अरुप यांनी वाणिज्य पदवीचे फक्त एक वर्ष पूर्ण केल्यानंतर कॉलेज सोडले आणि बाजारपेठेचा अभ्यास सुरू केला. त्यांनी स्थानिक फुल विक्रेत्यांशी संवाद साधण्यास सुरुवात केली. पश्चिम बंगालच्या पूर्व मिदनापूर जिल्ह्यातील कोपऱ्यात असलेल्या दुर्गम कोलाघाट गावात दररोज सकाळी मार्केट जाणून घेतले. झेंडूच्या चमकदार पिवळ्या आणि गुलाबाच्या मऊ गुलाबी रंगांनी भरलेला फुलांचा बाजार त्यांच्या स्वप्नांना ऊर्जा देत होता. या रंगीबिरंगी गजबजाटात, तरुण अरुप कुमार घोष मोठे झाले. त्यांना भारतातील घरांना फुलांनी जोडणाऱ्या व्यापाराच्या सौंदर्यात आणि लयीत प्रेरणा मिळाली. आता या व्यवसायात मोठ्या झालेल्या अरुप यांनी आपल्या शेतातील फुलांची काळजी घेण्यासाठी ८० कामगार कामावर ठेवले आहेत.

### हैदराबादमधील चाकरीत फुलले उद्योजकतेचे स्वप्न

फुलांमधील आवडीमुळे ते २०११ मध्ये हैदराबादला गेले. जिथे गुडीमलकापूर फ्लॉवर मार्केटमधील एका फुलांच्या दुकानात त्यांनी काम सुरू केले. ३३ वर्षीय अरुप सांगतात, की 'माझ्या सुरूवातीच्या कामात झेंडूच्या आणि गुलाबांसारख्या फुलांच्या माळा तयार करून विक्रीत मदत करणे समाविष्ट होते. सकाळी ६ ते दुपारी ४ वाजेपर्यंत काम करून मी दरमहा ३५०० रुपये कमवत होतो. तेथे असताना मला कळले, की कोलाघाटमधील फुले हैदराबादच्या फुलांच्या बाजारात पाठवली जात आहेत. यामुळे मला जाणवले, की मी माझ्या गावी परत जाऊ शकतो आणि या वाढत्या उद्योगात माझा व्यवसाय सुरू करू शकतो.'

### स्थानिक बाजारात खरेदी, शहरात विक्री

अरुप यांनी आपला प्रवास एका साध्या उपक्रमाने सुरू केला. कोलाघाट येथील गजबजलेल्या फुलांच्या बाजारातून ते चमकदार झेंडूच्या माळा खरेदी करत असत. ४०-८० रुपयांना खरेदी केलेल्या माळा नंतर कोलकाता व मोठ्या शहरातील बाजारपेठेत १००-१५० रुपयांना विकली जात असे. उत्सव आणि भक्तीचे प्रतीक असलेल्या चमकदार केशरी आणि पिवळ्या झेंडूच्या हारांना लवकरच उत्सुक खरेदीदार मिळत होते. प्रत्येक १०० माळांमधून त्यांना २००० ते ३००० रुपयांचा रोज नफा होऊ लागला. हे त्यांच्या मेहनतीचे उत्साहवर्धक बक्षीस होते. त्यातून त्यांना हुरूप आला. ते अधिक जोमाने कामाला लागले. जसजसे महिने जात गेले आणि आत्मविश्वास वाढत गेला तसतसे अरुप यांनी काहीतरी मोठे करण्याचे स्वप्न पाहण्यास सुरूवात केली. फक्त फुलांचा व्यापार करण्याऐवजी त्यांनी स्वतः फुले लागवड करण्याचा निर्णय घेतला. या धाडसी पाऊलाने त्यांच्या शेतीच्या प्रवासाची सुरूवात झाली. ज्यामुळे ते त्यांच्या आवडीला जागृत करणाऱ्या फुलांच्या आणखी जवळ आले.

### व्यवसायातील पहिले पाऊल



२०११ च्या अखेरीस अरुप कुमार घोष यांनी झेंडू शेतीचा प्रयोग करण्यासाठी दोन बिघे जमीन भाड्याने घेऊन फुलशेतीमध्ये पहिले धाडसी पाऊल टाकले. गुंतवणूक कमीत-कमी ठेवून त्यांनी जमीन भाड्याने घेण्यासाठी, रोपे खरेदी करण्यासाठी आणि वाहतूक खर्च व्यवस्थापित करण्यासाठी सुमारे १२ हजार रुपये खर्च केले. सुरूवातीला त्यांनी कोलाघाट बाजारातून स्थानिक झेंडूची रोपे विकत घेतली, पण वाढलेली फुले लहान आणि निकृष्ट दर्जाची होती. ती बाजाराच्या मानकांनुसार नव्हती आणि त्यांना तोटा होत होता. शिवाय नेहमीचे ग्राहक व व्यापारी नाराज होत होते. दुसरीकडे बाजारात नारंगी आणि पिवळ्या झेंडूच्या गेंदा फुलांना जास्त मागणी होती.

### थेट थायलंडचा दौरा अन् सहा महिने प्रशिक्षण

हार न मानता या नवख्या कृषी उद्योजकाने उच्च-गुणवत्तेच्या झेंडूच्या जातींबद्दल जाणून घेण्यासाठी थेट थायलंडचा दौरा केला. तेथे अनेक झेंडूच्या बागांना अन् कंपन्यांना भेट दिली. त्यांनी सहा महिने बँकॉक ब्लॉसम मार्केटमध्ये प्रशिक्षण घेतले. ज्यामुळे फुल शेतीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलला. अरुप कुमार घोष सांगतात, की 'मला टेनिस बॉल झेंडू नावाच्या उच्च-गुणवत्तेच्या फुलाबद्दल थायलंडमध्ये माहिती मिळाली. चमकदार, गोल फुलांसाठी आणि लांब पल्ल्याच्या शिपिंगला नुकसान न होता तोंड देण्याची क्षमता यासाठी हे वाण फारच मौल्यवान आहे.'

### उत्कृष्ट जातीच्या टेनिस बॉल झेंडूची लागवड

अरुप यांनी थायलंडहून गर्द पिवळ्या आणि नारंगी टेनिस बॉल झेंडूच्या जातीचे उत्कृष्ट असे 25 ग्रॅम बियाणे आणले. भाड्याने घेतलेल्या दोन बिघे जमिनीवर या झेंडूची लागवड करण्यास सुरूवात केली. प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या ज्ञानाचा वापर त्यांनी स्वतःच्या बिया आणि रोपे तयार करण्यासाठी केला. यातून उगवलेली फुले चांगल्या दर्जाची होती. त्यांनी ती गुजरात, हैदराबाद, लखनौ, कानपूर, दिल्ली, अयोध्या, अलाहाबाद आणि राजस्थान अशा वेगवेगळ्या शहरांमध्ये पाठवायला सुरूवात केली. देशभरातील बाजारपेठेने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि लवकरच भारतातील शेतकरी बियाणे आणि रोपांसाठी त्यांच्याकडे येऊ लागले.

### 'ट्रायल अँड एरर'ने शिकले हमखास शेती तंत्र

अरुप कुमार सांगतात, की 'शेतीच्या सुरूवातीच्या काळात मला कोणती गोष्ट अधिक चांगले रिझल्ट्स देते, हे शोधण्यासाठी वेगवेगळ्या खतांचा आणि उपचारांचा प्रयोग करावा लागला. हे सर्व प्रयोग आणि त्यातील फायदे व त्रुटींवरून हळूहळू अभ्यास करून मी नेमकेपणा शिकलो. त्यातून हळूहळू परिणाम दिसू लागले. फुले फुलू लागली आणि त्यांची मागणीही वाढली.'

एका लहान फुलांच्या व्यापाऱ्यापासून ते पूर्ण उद्योजकापर्यंत अरुप कुमार यांचा प्रवास थक्क करणारा आहे. फुलांचा व्यापार करण्याऐवजी त्यांनी स्वतः फुले लागवड सुरू केली, ती यशस्वी केली, त्यात वेगवेगळे प्रयोग केले. २०१२ पर्यंत या नवोदित शेतकऱ्याला उच्च दर्जाच्या झेंडूच्या फुलांचे पहिले यशस्वी पीक घेता आले. स्थानिक कोलाघाट बाजारात त्याची १०० रुपये प्रतिकिलो या दराने विक्री झाली. बंगालमधील स्थानिक शेतकरी लवकरच मोठ्या प्रमाणावर रोपांसाठी त्यांच्याकडे येऊ लागले. यामुळे त्यांच्या कृषी उद्योजकीय प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आला, ज्यामुळे ते फुलांच्या कमिशनवरील छोट्या व्यापाऱ्यापासून पूर्ण क्षमतेने उद्योजक बनू शकले. त्यांनी लागवड सहा बिघापर्यंत वाढवली, जिथे टेनिस बॉल झेंडूच्या जातीचे बियाणे आणि रोपे दोन्ही तयार केले.

### झेंडूला हंगामीच नव्हे तर वर्षभर मागणी

अरुप कुमार यांना लक्षात आले, की झेंडूला फक्त हंगामीच नाही तर वर्षभर मागणी असते. एकदा योग्य वाण मिळाले अन् त्यांना जाणवले, की नफ्याची क्षमता खूप मोठी आहे. फुले, बिया आणि रोपे विकून त्यांनी शेती पूर्णवेळ व्यवसायात रूपांतरित केली. ते अभिमानाने सांगतात, की 'माझ्या बियाण्यांना आणि रोपांना संपूर्ण भारतात खूप मागणी आहे. मी गहू आणि भात यांसारखी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना झेंडू शेतीकडे वळण्यास मदत केली आहे आणि त्यांनी स्वतः त्याचे फायदे अनुभवले आहेत.'

### सोशल मीडियाचा प्रभावी वापर

विक्री वाढवण्यासाठी 33 वर्षीय अरुप कुमार हे फेसबुक आणि इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर खूप अवलंबून असतात. त्यांनी सुरुवात केली, तेव्हा सोशल मीडिया इतका प्रगत नव्हता. आता, देशभरातील ग्राहकांशी आणि शेतकऱ्यांशी संपर्क साधणे त्यांना खूप सोपे झाले आहे. ते त्यांच्या शेती कामाचे प्रदर्शन करण्यासाठी आणि उत्पादने विकण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरतात.

### आव्हानांना तोंड देत अनुभवातून शिकले

फुलांच्या शेतीचा प्रयोग करणारा कुटुंबातील पहिला व्यक्ती म्हणून, अरुप कुमार यांना त्यांच्या शेतजमिनीवर झेंडूची लागवड करताना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. त्यांच्यातील एक प्रमुख चिंता म्हणजे पाण्याचे व्यवस्थापन करणे, विशेषतः पावसाळ्यात, कारण जास्त पाण्यामुळे पिकांचे नुकसान होऊ शकते. मुख्य म्हणजे शेतात जास्त पाणी साचून राहणार नाही याची खात्री करणे. त्यांना शेत जमिनीतील ड्रेनेज सिस्टीम प्रभावी आहे, याची खात्री करावी लागकी, जेणेकरून पाणी साचून झाडांना नुकसान होणार नाही. पाण्याचे व्यवस्थापन करण्यासोबतच, त्यांना पिकांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळावा, याची खात्री करावी लागत असे. झेंडूला भरपूर सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते, म्हणून ते खात्री करतात की, जमीन उंच झाडांनी किंवा इतर अडथळ्यांनी झाकली जाणार नाही. शिवाय, वादळ आणि पूर यासारख्या अप्रत्याशित हवामान परिस्थिती पिकांसाठी सतत धोका निर्माण करत होत्या. त्याही त्यांना संरक्षण देण्यासाठी खबरदारी घ्यावी लागत असे. ते सांगतात, की 'मी शेतात जाळी झाकतो, जेणेकरून ते कठोर हवामानात चांगले वाढू शकतील.' अरुप पिकांपासून स्वतःचे बियाणे आणि रोपे तयार करत आहेत. त्यात कीटक हे एक मोठे आव्हान होते, परंतु त्यांनी दृढनिश्चयाने आणि नैसर्गिक उपायांनी त्याला तोंड दिले. हानिकारक रसायनांवर अवलंबून राहण्याऐवजी, त्यांनी कडुलिंबाचे तेल, हाडांचा चुरा आणि शेणखत वापरले. 'या पद्धती वनस्पती आणि पर्यावरणासाठी सौम्य आहेत, ज्यामुळे पिकांना हानी न पोहोचवता कीटकांना नियंत्रणात ठेवण्यास मदत होते,' असे अरुप कुमार सांगतात. आणखी एक आव्हान म्हणजे विस्तारत चाललेल्या व्यवसायाचे व्यवस्थापन करण्यासाठी कामगारांना प्रशिक्षण देणे. ते सांगतात, की 'झेंडू वाढवण्याची योग्य पद्धत त्यांना शिकवण्यासाठी वेळ लागतो, मी एका वेळी १० कामगारांना प्रशिक्षण देईल आणि त्यांनी इतरांसोबत ते ज्ञान शेअर केल्यास कौशल्यांचा प्रसार होईल आणि व्यवसाय अधिक मजबूत होण्याची खात्री होईल.'

### वर्षभरात ४ कोटी रोपांची विक्री

२०२४ मध्ये त्यांनी अंदाजे ४ कोटी रोपे विकली. आज, अरुप यांची शेती २९.२ एकर म्हणजे तब्बल ७३ बिघे क्षेत्रात पसरलेली आहे. जेथे ते संत्रा, पिवळा आणि लाल अशा विविध झेंडूच्या जातींची लागवड करतात. ते सांगतात, की 'कोलकात्याबाहेर संत्र्याच्या जातीला सर्वाधिक मागणी असल्याचे आढळून आले. २०२५ मध्ये आम्ही अंदाजे चार कोटी रोपे आणि १५०० किलो झेंडूच्या बिया विकल्या. २५ हजार रुपये प्रतिकिलो या किमतीच्या या बियाण्यांमुळे उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्रोत निर्माण झाला आहे. विशेषतः ही मागणी संपूर्ण भारतात पसरली आहे, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि उत्तर प्रदेश सारख्या राज्यांतील शेतकऱ्यांकडूनही याची मागणी आहे. झेंडूच्या फुलांचाही कमाईत मोठा वाटा आहे. सुगीच्या काळात, माझ्या शेतातून दररोज ८०० ते १००० किलो झेंडूची फुले येतात, जी हैदराबाद, कोलाघाट आणि हावडा येथील घाऊक बाजारात विकली जातात. कापणीच्या ३-५ महिन्यांत फक्त या फुलांपासून १ ते २ कोटी रुपये उत्पन्न मिळते.'

कोलाघाट येथील फुलांचे घाऊक विक्रेते दिलीप भौमिक म्हणतात, की 'मी गेल्या काही वर्षांपासून अरुप कुमार यांच्या येथून झेंडूची फुले आणि रोपे खरेदी करत आहे. मी त्यांच्या गुणवत्तेवर खूप समाधानी आहे. फुले नेहमीच ताजी, तेजस्वी आणि मोठी असतात, जी त्यांना बाजारातील इतरांपेक्षा वेगळी ठरवते. त्यांची वाढ आणि संगोपन करण्यात ते खूप काळजी घेतात. आता मी दर्जेदार फुलांसाठी त्यांच्यावर अवलंबून राहतो.'

### दर महिन्याला सरासरी ५० लाखांचे उत्पन्न

आजच्या घडीला, अरुप कुमार यांच्या शेतातून वार्षिक ६.३५ कोटी ते ७.३६ कोटी रुपयांचे प्रभावी उत्पन्न मिळते. त्यांचे सरासरी मासिक उत्पन्न सुमारे ५० लाख रुपये आहे. हे आता एक मोठे काम आहे, ८० कामगार लागवड, कापणी आणि शेतीची देखभाल करण्यास मदत करतात. मागे वळून पाहताना अरुप कुमार दास विचार करतात, की 'मी सहज एखाद्या दुकानात किरकोळ कामाला राहू शकलो असतो, परंतु उद्योजकता आणि शेतीमध्ये झेप घेतल्याने फुलशेतीबद्दलची माझी समज अधिकच वाढली आहे. माझ्या शेतीतील यश मला अभिमानाने भरून टाकते आणि मला आशा आहे की, माझा प्रवास या क्षेत्रात करिअर घडवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या इतरांना प्रेरणा देईल.'

# टिटव्या रात्री का ओरडतात? काय असतात संकेत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टिटव्यांचा रात्रीच का ओरडण्याचा आवाज कानी पडतो? काय असतात संकेत? याविषयी अनेकांना माहीत नाही. काय आहे यामागील प्रकार. हे जाणून घेऊया.

### टिटव्यांचा आवाज

टिटव्या फक्त रात्रीच ओरडतात असे नाही. त्या दिवसा देखील ओरडतात. मात्र दिवसा वाहने, माणसे आणि गोंगाटामुळे त्यांचा आवाज जाणवत नाही.

### 'टीव... टीव...' आवाजाचा इशारा

रात्री शांत वातावरणात टिटव्यांचा इशारादायक आवाज लांबवर ऐकू येतो. त्यामुळे लोकांना तो जास्त जाणवतो.

### निशाचर पक्षी

टिटवी हा पक्षी दिवसाही सक्रिय असतो. मात्र अंधारातही पाहण्याची त्याची दृष्टी उत्तम असल्याने तो रात्रीही सतर्क राहतो.



### जमिनीवर अंडी घालणारा पक्षी

टिटव्या झाडावर घरटी बांधत नाहीत. त्या मोकळ्या जागी, थेट जमिनीवर अंडी घालतात. त्यामुळे त्याचा धोका जास्त असतो.

### संरक्षणासाठी ओरड

कोल्हा, मांजर, साप, मुंगूस, घोरपड यांसारखे प्राणी जवळ आले, की टिटव्या जोरात ओरडून सावध करतात.

### शुभ-अशुभ

टिटव्यांचे ओरडणे म्हणजे वाईट घडणार, याचा कोणताही वैज्ञानिक आधार नाही. ही अंधश्रद्धा आहे.

### निसर्गातील सजग प्रहरी

टिटवी हा निसर्गाचा सजग आणि सतर्क पक्षी असून, तो फक्त आपल्या अंड्यांचे आणि परिसराचे रक्षण करत असतो.

# 'पत्नीने पतीवर आवाज चढवला पाहिजे...'; राणी मुखर्जीचे वक्तव्य

## पती आदित्य चोप्रांबद्दल म्हणाली असे काही की...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राणी मुखर्जीला नुकतीच मनोरंजनविश्वात तीन दशके पूर्ण झाली आहेत. सध्या ती तिच्या 'मर्दानी ३' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. राणी नेहमीच विविध विषयांवरील तिची मतं ठामपणे मांडत असते. अशातच ती पुन्हा एकदा तिच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे.

वडिलांच्या स्वभावाचा मुलाच्या स्वभावावर कसा परिणाम होतो, याबद्दल तिने 'बॉलिवूड हंगामा'शी संवाद साधताना सांगितले आहे. राणी मुखर्जी म्हणाली, की 'मला असे वाटते, आदर घरातूनच सुरू होतो. जेव्हा तुम्ही तुमच्या आईला घरी चुकीची वागणूक मिळताना पाहता, तेव्हा त्या घरातील मुलावर याचा परिणाम होतो. त्याला असे वाटू लागते, की जर माझ्या आईला अशी वागणूक मिळत आहे तर इतर स्त्रियांनासुद्धा अशीच मिळत असेल.'

राणी पुढे म्हणाली, की 'मला असे वाटते, सर्व वडिलांनी याची जबाबदारी घ्यायला हवी; कारण ते जसे त्यांच्या पत्नीला वागवतात, तेच त्यांची मुले पाहून मोठी होतात. तेच जर तुमच्या आईला चांगली वागणूक मिळत असेल, तिला आदर दिला जात असेल तर मुलांनाही कळतं की स्त्रियांना समाजात सन्मान आहे.'



### राणी मुखर्जीचे वक्तव्य

राणी पुढे म्हणाली, की 'हे सगळे घरातूनच सुरू होते. पतीने पत्नीवर आवाज वाढवणे अशा गोष्टीसुद्धा व्हायला नाही पाहिजे. मग त्या पत्नीने पतीवर आवाज वाढवला पाहिजे.' याच संभाषणात तिने तिच्या शाळेतील एक प्रसंग सांगितला आहे. तिने एकदा एका मुलाला कानाखाली मारलेली याबद्दल सांगितले आहे. अभिनेत्री म्हणाली, की 'मी फक्त एकाच मुलाला मारले आणि बाकीची सगळी मुले माझे मित्र झाले. तुम्ही फक्त माझ्या नवऱ्याला जाऊन विचारू नका की त्याच्याबरोबर घरी काय होते.'

दरम्यान, राणी मुखर्जी सध्या तिच्या 'मर्दानी ३' चित्रपटामुळे चर्चेत आहे. यशराज फिल्मसनेच या चित्रपटाची निर्मिती केली आहे. राणी या चित्रपटात मुख्य भूमिकेत असून यापूर्वी आलेल्या चित्रपटाच्या दोन्ही भागांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळालेला आहे.

# १७७० में पांच भारतीयों ने बसाया था ये खूबसूरत समुद्री देश

## वहां क्यों गए उपराष्ट्रपति; कम लोगों को मालूम होगा किस्सा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ये समुद्री देश मालद्वीव या श्रीलंका नहीं बल्कि हिंद महासागर में स्थित एक खूबसूरत द्वीपसमूह है, जो अपने सफेद रेत के समुद्र तटों, नीले पानी और हरे-भरे जंगलों के लिए जाना जाता हैं। भारत के साथ इसके अच्छे रिश्ते दशकों पुराने नहीं बल्कि एक तरह से सदियों पुराने हैं।

भारत के उपराष्ट्रपति सी.पी. राधाकृष्णन बेहद खूबसूरत समुद्री देश सेशेल्स का दौरा करके वहां नवनिर्वाचित राष्ट्रपति पैट्रिक हर्मिनी के शपथ ग्रहण समारोह में हिस्सा लिया। भारतीय विदेश मंत्रालय ने बताया कि समारोह के बीच उपराष्ट्रपति राधाकृष्णन ने सेशेल्स के नवनिर्वाचित राष्ट्रपति पैट्रिक हर्मिनी को भारत की ओर से बधाई देते हुए दोनों देशों के बीच घनिष्ठ, दीर्घकालिक संबंधों पर चर्चा की।



### सदियों पुराना नाता

आपको बताते चलें कि भारत और सेशेल्स का सदियों पुराना नाता हैं। वहां के राष्ट्रपति के शपथ ग्रहण समारोह में शामिल होने से पहले राधाकृष्णन ने सेशेल्स में प्रवासी भारतीय समुदाय को संबोधित किया। उन्होंने भारत और सेशेल्स के रिश्तों को और मजबूत बनाने में प्रवासी भारतीयों की भूमिका की सराहना की। सीपी राधाकृष्णन ने पीएम नरेंद्र मोदी के ' महासागर ' (क्षेत्रों में सुरक्षा और विकास के लिए पारस्परिक एवं समग्र उन्नति) दृष्टिकोण का भी जिक्र किया। राधाकृष्णन ने जोर देते हुए कहा कि सेशेल्स भारत के महासागर वाले विजन को आगे बढ़ाने में एक महत्वपूर्ण भागीदार बना हुआ है।

### पांच भारतीयों से बसा था ये देश, कम लोगों को मालूम होगा किस्सा

भारत-सेशेल्स के बीच का संबंध गहरी मित्रता, समझ और सहयोग का प्रतीक है. विदेश मंत्रालय ने कहा, '१७७० में पांच भारतीयों का एक समूह सात अफ्रीकी दासों और १५ फ्रांसीसी उपनिवेशवादियों के साथ बागान श्रमिकों के रूप में सेशेल्स पहुंचा था और उन्हें द्वीप समूह का पहला निवासी माना गया था।' ये कहानी कम लोगों को ही मालूम होगी कि मॉरीसस की तरह सेशेल्स से भी भारत का अटूट संबंध और पुराना नाता है।

१९ जून १९७६ यानी सेशेल्स के स्वतंत्रता दिवस पर भारत-सेशेल्स के राजनयिक संबंध स्थापित हुए। आईएनएस नीलगिरि की टुकड़ी वहां स्वतंत्रता दिवस समारोह में शामिल हुई। पीएम मोदी २०१५ में इस खूबसूरत समुद्री देश के दौरे पर गए थे। भारत सरकार ने तब सेशेल्स में तटीय निगरानी रडार प्रणाली मजबूत कराने के साथ ही एक और डोर्नियर प्लेन गिफ्ट देने और सेशेल्स निवासियों को भारत यात्रा के लिए ३ महीने फ्री वीजा देने का ऐलान किया था।


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे






# श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज शैल्यगमन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ अर्थात श्री गुरुप्रतिपदेच्या दिवशी श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज कर्दळी वनात गुप्त झाले. शैल्यगमनास जाताना स्वतःच्या निर्गुण पादुका स्वामींनी श्रीक्षेत्र गाणगापूर येथे सेवेकरिता ठेवल्या. याविषयी...

**बहुधान्य संवत्सर माघमास । कृष्णप्रतिपदा शुभ दिवस । बृहस्पती होता सिंहराशीस । उत्तर दिशो होता सूर्य पैं ।।**
**शिशिरऋतु कुंभ संक्रमण । लग्नघटिका सुलक्षण । ऐसं शुभमुहूर्ती गुरु आपण । आनंदें प्रयाण करिते जाहले ।।**
**मध्यें प्रवाहांत पुष्पासनीं । बैसोनि शिष्यांस संबोधोनी । आमुचा वियोग झाला म्हणौनि । तुम्हीं मनीं खेद न मानावा ।।**
**त्या गाणगापूरांत । आम्हक असोंच पूर्ववत । भावना धृढ धरा मनांत । तुम्हा दृष्टांत तेथें होईल ।।**
**आम्ही जातो आनंद स्थानासी । तेथें पाहलों याची खूण तुम्हांसी । फुले येतील जिनसजिनसीं ।।**
**दयेची, कृपेचीच जी शुद्ध मूर्ती ...धाव घेई हे मन गाणगापुरी.....!!**
**ध्यान मूलं गुरु मूर्ति, पूजा मूलं गुरु पादुका। मन्त्र मूलं गुरु वाक्यं, मोक्ष मूलं गुरु कृपा।।**

माघ कृष्ण प्रतिपदा. या तिथीला अतीव प्रेमादराने ‘श्रीगुरुप्रतिपदा’ असे संबोधले जाते. त्याचे कारणही तसेच आहे. द्वितीय श्रीदत्तावतार भगवान श्री नृसिंह सरस्वती सरस्वती स्वामी महाराजांनी याच पावन तिथीला शैल्यगमन केले होते. श्रीगुरुप्रतिदा हा खूप वैशिष्ट्यपूर्ण उत्सव आहे. याच पुण्यपावन तिथीला अनेक उत्सव असतात. अशा सर्व सुयोगांमुळे श्रीगुरुप्रतिपदा ही फार विशेष पुण्य तिथी असून सर्वच गुरू संप्रदायांमध्ये मोठ्या प्रमाणावर साजरी होते.

या तिथीला भगवान श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी श्रीक्षेत्र गाणगापूर येथे आपल्या ‘निर्गुण पादुका’ स्थापन करून शैल्यगमन केले होते. म्हणून हा उत्सव गाणगापूरला खूप भव्य दिव्य स्वरूपात साजरा होत असतो. हा दिवस श्रीक्षेत्र गाणगापूर येथे फार मोठ्या प्रमाणात साजरा होतो. येथे यतिपूजन होते. येथे देशातील विविध भागांतून अनेक संन्यासी उपासक व भक्त मोठ्या प्रमाणात यात्रा प्रसंगाने येऊन श्रीचरणी अभिषेक पूजा, नैवेद्य व पालखी सेवेत सहभागी होतात. भगवान श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी कृष्णातीरावरील श्रीक्षेत्र औदुंबर येथे एक चातुर्मास वास्तव्य




झाल्यावर आपल्या ‘विमल पादुका’ स्थापन करून वाडीला गमन केले होते. ते श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे बारा वर्षे राहिले व अनेक लीला केल्या. तेथून त्यांनी अश्विन कृष्ण द्वादशी, श्रीगुरुद्वादशीच्या मुहूर्तावर आपल्या ‘मनोहर पादुका’ स्थापन करून गाणगापूरकडे प्रयाण केले. गाणगापूर येथे चोवीस वर्षे वास्तव्य करून या पावन तिथीला आपल्या ‘निर्गुण पादुका’ स्थापन करून ते लौकिक अर्थाने श्रीशैल्य मल्लिकार्जुन क्षेत्री जाऊन अदृश्य झाले. त्यांनी आपला देह ठेवलेला नाही, ते फक्त अदृश्य झालेले आहेत, हा एक दुर्मिळ योगच म्हणावा लागेल.

भगवान श्रीगुरू नृसिंह सरस्वती सरस्वती स्वामी महाराजांचेच साक्षात् स्वरूप असणाऱ्या या तिन्ही पादुकांना विशेष नावे आहेत. अनेक भक्त नेहमीच या नावांचा अर्थ जाणून घेऊ इच्छितात, म्हणून या तीन पादुकांसंदर्भात संक्षेपाने माहिती देत आहोत.

विमल पादुका व मनोहर पादुका या पाषाणाच्या असून निर्गुण पादुका कशापासून बनलेल्या आहेत, हे कोणालाच माहीत नाही. विमल पादुका सोडता बाकी दोन्ही पादुकांच्या नावांचे संदर्भ श्रीगुरुचरित्रात पाहायला मिळतात. किंबहुना श्रीगुरुचरित्रातील उल्लेखांमुळेच त्यांची ही नावे रूढ झालेली आहेत. औदुंबर येथे भगवान श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी एक चातुर्मास आपल्या अनुष्ठानात व्यतीत केला होता. त्यांच्या त्या एकांतवासाचा संदर्भ घेऊनच औदुंबर येथील पादुकांना विमल पादुका म्हणत असावेत. पण या नावाचा उल्लेख श्रीगुरुचरित्रात नाही. विमल म्हणजे अत्यंत शुद्ध, कोणताही मल, दोष नसणा–या पादुका. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील पादुकांविषयी स्वतः श्रीनृसिंह सरस्वती महाराज म्हणतात,

**तुम्हां सहित औदुंबरी । आमुच्या पादुका मनोहरी ।**
**पूजा करिती जे तत्परीं । मनोकामना पुरती जाणा ।।**

देव वाडी सोडून निघाल्यामुळे दुःखी झालेल्या चौसष्ट योगिनींची समजूत घालताना स्वामी महाराज म्हणतात की, जे कोणी भक्त तुम्हां योगिनींसहित आमच्या मनोहर पादुकांची मनोभावे पूजा, सेवा करतील त्यांना इच्छित गोष्ट नक्कीच मिळेल. भगवान श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज शैल्यगमनापूर्वी आपल्या भक्तांना अभयवचन देताना म्हणतात–

**कल्पवृक्षातें पूजोन । यावें आमुचें जेथ स्थान ।**
**पादुका ठेवितो निर्गुण । पूजा करावी मनोभावें ।।**

### पुष्प नंदी नामक शिष्यास मिळालेले प्रसाद पुष्प

भीमा अमरजा संगमावरील कल्पवृक्षसम अश्वत्थाची पूजा करून आमच्या मठस्थानातील निर्गुण पादुकांची मनोभावे पूजा करावी, असे स्वतः श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी म्हणतात. श्रीक्षेत्र गाणगापूर येथील निर्गुण पादुका मात्र अत्यंत अद्भुत व विलक्षण आहेत. या पादुका कशापासून बनवलेल्या आहेत, हे आजवर कोणालाही कळू शकलेले नाही आणि यांना विशिष्ट असा आकार नाही. म्हणून या पादुकांना ‘निर्गुण पादुका’ म्हणतात. येथे निर्गुण शब्दाचा अर्थ विशिष्ट आकार नसलेल्या व शब्दांनी सांगता न येणाऱ्या पादुका असाच घ्यायला हवा. या निर्गुण पादुकांना पाण्याचा स्पर्श कधीच होत नाही. त्याऐवजी केशर व अत्तराचे वरून लेपन केले जाते. त्या लंबगोल आकाराच्या पेटीमध्ये ठेवलेल्या असतात.

श्री गुरु श्रीशैल्यास जाताना भक्तांना आश्वासन दिले की ४ प्रसाद पुष्प येतील ती मुख्य शिष्यानी घ्यावी. यापैकी एक पुष्प श्री सायंदेवास मिळाले होते अनेक दत्त

# मंगळवारचा सोपा तोडगा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माणसाच्या आयुष्यात समस्या असणे, ही साधारण गोष्ट आहे. पण अनेकदा उपाय करूनही समस्या, अडचणी दूर होत नसेल तर टेन्शन येते. अशावेळी अनेकांना संकटमोचन हनुमानजी आठवतात. शास्त्र सांगते, की दर मंगळवारी हनुमानजींची पूजा केली तर सर्व संकटे दूर होतात. कारण मंगळवार हा हनुमानजींना समर्पित असतो. हनुमानजींची दर मंगळवारी मनोभावे पूजा करून काही खास उपाय केले तर आयुष्यातील अडचणी दूर होतात. ते उपाय कोणते ते आपण जाणून घेऊ.

असे म्हणतात, की हनुमानजींना तुळशीची पाने खूप प्रिय आहेत. त्यामुळे दर मंगळवारी हनुमानजींना तुळशीची पाने अर्पण करावीत. असे केल्याने आयुष्यातील कष्ट दूर होणार.

हनुमानजींना सिंदूर म्हणजेच कुंकू अर्पण करावा. हनुमानाशजींना सिंदूर अर्पण करणे शुभ मानले जाते. यामुळे आयुष्यातील संकटे कमी होतात.

मंगळवारी हनुमानजींना नारळ अर्पण करावा, असे केल्याने सर्व संकटे दूर होतात.

मंगळवारी हनुमान चालिसाचे पठण केले तर आयुष्यातील सर्व संकटे आणि दुःखे दूर होतात.

ओम क्र क्रा क्रा सह भौमाय नमः या मंत्राचा मंगळवारी जप करावा. यामुळे संकटे आणि आयुष्यातील अडचणी दूर होतात.

मंगळवारी हनुमानजींना ११ पिंपळाची पाने अर्पण करावीत. यामुळे आयुष्यातील संकटे दूर होतात.

मंगळवारी मोहरी किंवा चमेलीच्या तेलाचा दिवा हनुमानजींसमोर लावावा. सर्व अडचणी दूर होणार.

# सुखकर्ता–दुःखहर्ता श्रीगणेश लोकप्रियच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्याच्या काळात ज्यांच्या केवळ आराधनेने मनाला उभारी येऊन मनाची ताकद वाढते, आत्मविश्वास निर्माण होतो, दुःख विसरले जाऊन आत्मबल वाढते व प्राप्त परिस्थितीवर मात करण्याची किंवा मात करता न आल्यास ती सहन करण्याची शक्ती निर्माण होते असे सुखकर्ता–दुःखहर्ता श्रीगणेश जास्तच लोकप्रिय झाले आहेत. यामुळे दरवर्षी कोट्यवधी गणेशभक्त अष्टविनायक, गणेशांची साडेतीन पिठे व पुराणोक्त गणेश यांची मोठ्या भक्तिभावाने यात्रा करताना आढळतात.

### श्रीगणेशाची साडेतीन पिठे खालीलप्रमाणे

**१) मोरगावचा मयुरेश्वर**



ब्रह्मा, विष्णू, शिव, शक्ती व सूर्य या पाच देवतांनी मोरगावला तप केले तेव्हा आदिशक्तीस्वरुप श्रीगणेशाने त्यांना दर्शन दिले. त्यांच्या प्रार्थनेनुसार गणेशाने त्या क्षेत्रात वास्तव्य करुन त्याला श्रेष्ठत्व देण्याचे मान्य केले. या पंचदेवतांनी भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी येथे श्रीगणेशाची विधीपूर्वक प्रतिष्ठापना केली. येथे राहून जे पुरश्चरणादि करतील त्यांना मायाबंधनांची व विघ्नांची भीती मुळीच राहणार नाही असा गणेशाने आशीर्वाद दिला.

**२) राजूरचा महागणपती**



जालना जिल्ह्यातील राजूर येथे ‘वरेण्य’ नावाच्या राजाचा मोठा वाडा होता, त्याच्या आसपासच्या वस्तीला राजापुरी व पुढे राजूर म्हणू लागले. या वाडयाच्या आजूबाजूस दंडकारण्य होते व ऋषिमुनी येथे तपस्या करीत. वरेण्य राजाला मूल नव्हते तेव्हा त्याने तेथेच तपस्या केली व गणेशाने स्वतः त्याच्या पत्नीच्या पोटी जन्म घेतला. पण या मूलाची आकृती काही विचित्र होती. म्हणून राजाने त्याला टाकून दिले. ऋषिमुनींनी या मुलाचे संगोपन केले. या काळी त्या भागात सिंदूरासूर फार मातला होता. त्याचे पारिपत्य करण्याचे कर्तव्य या मुलाकडे म्हणजे गणेशाकडे आले व त्याने याचा शिरच्छेद करुन ते पार पाडले व प्रजेला निर्भय केले. त्यामुळे राजाला आपली चूक कळून येऊन तो गणपतीला शरण आला. गणपतीने त्याच्या इच्छेप्रमाणे त्याच्या निरंतर सनिद्ध राहण्याचे मान्य केले. तोच हा राजूरचा गणपती. येथे श्रीगणेशाचे अतिभव्य मंदीर असून मंदिरामध्ये हजारो समयांचा अखंड नंदादीप तेवत असतो. सतत तेवणा–या समयांच्या मंद प्रकाशात देवाचे दर्शन होते. या मंदीरात श्रींच्या मूर्तीसमोर वेरण्य राजाची मूर्तीही स्थापन करण्यात आलेली आहे.

**३) चिंचवडचा मंगलमूर्ती**



कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील ‘शाली’ नावाच्या गावचे वामनभट व पार्वतीबाई हे दाम्पत्य मोरगावला आले. या दोघांनी पुत्रप्राप्तीसाठी अनुष्ठान केले. त्यांना माघ वद्य चतुर्थी शके १२९७ मोरगावला श्रीगणेशकृपेने मुलगा झाला. त्याचे नाव त्यांनी ‘मोरया गोसावी’ ठेवले. नयनभारती यांच्याकडून अनुग्रह घेतलेले मोरया गोसावी थेऊरला अनुष्ठानासाठी आले. तिथे त्यांना मुळा–मुठेच्या नदीत स्नान करताना श्रीगणेशाचा साक्षात्कार होऊन श्रीगणेशमूर्तीचा प्रसाद मिळाला. नंतर ते चिंचवडजवळ थेरगावला किवंजाई देवीच्या मंदिरात आले व तेथून लोकग्रहाने चिंचवडला आहे. त्यांच्यामुळे चिंचवड हे श्रीगणेशक्षेत्र प्रसिद्धीला आले. आजही तिथे त्यांची संजीवनी समाधी आहे.

**४) पद्मालयचा प्रवाळ गणेश (अर्धपीठ)**



जळगावपासून १५ कि.मी. एरंडोलजवळ ‘पद्मालय’ हे तीर्थ असून ते श्रीगणेशाचे अर्धपीठ आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात आमोद व प्रमोद अशा गणरायाच्या उजव्या व डाव्या सोंडेच्या दोन मूर्ती आहेत. (१) हात–पाय नसलेल्या ‘कार्तवीर्य’ नावाच्या गणेशभक्ताने श्रीगणेशाची आराधना केली तेव्हा त्याला उजव्या सोंडेच्या श्रीगणेशाने दर्शन दिले. गणेशकृपेने कार्तवीर्याचे अपंगत्व नाहिसे झाले. (२) माझ्यामुळे भगवान शंकराला शांती लाभली’ असा शंकराच्या गळयातल्या नागाला गर्व झाला तेव्हा शंकराने तो नाग गळयातून फेकून दिला. नागाने शंकरप्राप्तीसाठी श्रीगणेशाची आराधना केली तेव्हा डाव्या सोंडेच्या गणपतीने त्याला दर्शन दिले. श्रीगणेश कृपेने शंकराने नागाचा स्वीकार केला. या दोन घटना पद्मालय येथे घडल्या. येथील तळयात कमळाची फुले असल्याने याला ‘पद्मालय’ असे म्हणतात.




## हनुमान : हिमालयातील अमरत्वाचे रहस्य आणि कलियुगातील अस्तित्व

**हनुमानजी अमर आहेत का?**

हा प्रश्न हजारो वर्षांपासून भक्तांच्या मनात आहे आणि उत्तर श्रद्धा, इतिहास व चमत्कारांत दडलेले आहे. त्रेतायुगातील प्रभू श्रीरामचंद्रांची अखंड भक्ती, महाभारतात अर्जुनाच्या रथावर असलेली अदृश्य उपस्थिती, माता सीता यांचे अमरत्वाचे वरदान आणि कलियुगाच्या अंती भगवान कल्की यांना मदत करण्याचे भविष्यवचन हनुमानजींच्या प्रवासकाळाच्या पलीकडे जातो.

आजही हिमालयातील दुर्गम प्रदेशात तपश्चर्या, तुळशीदास, समर्थ रामदास स्वामींना दिलेले दर्शन, केदारनाथातील भीमशिला आणि इतर चमत्कारीक संकेत.

विज्ञान जेथे थांबते तेथून श्रद्धा सुरू होते. हनुमानजी केवळ इतिहास नाहीत ते आजही अस्तित्वात असलेली शक्ती आहेत.

**। जय बजरंग बली ।**

# गणपती बाप्पांच्या या ६ अद्भुत गोष्टी आयुष्याचे धडे शिकवतील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक धार्मिक कार्य आणि सणाची सुरूवात गणपती बाप्पांच्या पूजनाने होते. गणपती बाप्पांच्या मूर्तीची रचना अशी आहे, की त्यात मानव आणि प्राणी दोन्ही (हत्ती) यांचे मिश्रण दिसते. ज्यामुळे त्याच्या आराधनेच्या दिशेने लोकांमध्ये खोल आध्यात्मिक महत्त्व असलेली दार्शनिक संकल्पना दिसून येते.

गणपती बाप्पांचे रूप हत्तीचे डोके, मोठे पोट आणि उंदरावर स्वार होताना दिसते. गणपती बाप्पा हे बुद्धी आणि ज्ञानाचे प्रतीक मानले जातात. ते सर्व त्रास दूर करतात म्हणून त्यांना ‘विघ्नेश्वर’ म्हटले जाते. त्यांचे हत्तीचे डोके बद्धीचे प्रतीक आहे आणि त्यांचे मोठे कान हे दर्शवितात, की ते त्यांच्या भक्तांचे लक्ष देऊन ऐकतात. गणपती बाप्पांबद्दल अशा अनेक कथा आहेत ज्या सांगतात की ते बुद्धीचे दैवत आहेत.

गणपती बाप्पांच्या ६ अद्भुत गोष्टी आहेत, की ज्या जीवनात लागू करू शकतो.

### जबाबदारीची भावना ठेवा

आपल्या सर्वांना भगवान शिव यांची कथा माहीत आहे, की गणेशजींना हत्तीचे डोके कसे मिळाले. या कथेतून आपण



शिकतो की आपण नेहमी आपले कर्तव्य आणि जबाबदारीचे पालन केले पाहिजे. माता पार्वतींच्या आज्ञेनुसार गणपती बाप्पांनी आपल्या मस्तकाचे बलिदान दिले होते.

### मर्यादित संसाधनांचा सर्वोत्तम वापर करावा

आपल्यापैकी बहुतेकांना जीवनात मर्यादित संसाधन असल्याची तक्रार असते. पण श्री गणेश आणि कार्तिकेय यांची कथा जीवनात मर्यादित संसाधनांचा सर्वोत्तम वापर कसा करावा, हे शिकवते. कथेनुसार एकदा श्री गणेश आणि कार्तिकेय यांच्यादरम्यान त्यांचे पालक शिव–पार्वती यांनी जगात तीन फेऱ्या करण्याची स्पर्धा आयोजित केली. त्यात विजेत्याला चमत्कारिक फळाचे बक्षीस ठेवले गेले. कार्तिकेय लगेच त्यांच्या मोर वाहनात चढले. गणेशजींना माहीत होते की त्यांची सवारी एक उंदीर आहे, त्यावर बसून ते कार्तिकेय यांना मागे सोडू शकत नाहीत. म्हणूनच त्यांनी त्यांच्या पालकांच्या तीन फेऱ्या केल्या आणि सांगितले, की त्यांच्यासाठी ते संपूर्ण जग आहेत. अशा प्रकारे मर्यादित संसाधनांनी आणि बुद्धीचा वापर करून स्पर्धा जिंकून गणेशजींना चमत्कारिक परिणाम मिळाले.

### चांगले श्रोते व्हा

गणेशजींचे मोठे कान प्रभावी संवादाचे प्रतीक आहेत. एक चांगला श्रोता परिस्थिती चांगल्याप्रकारे समजू शकतो. इतरांचे नीट ऐकणे आपल्याला परिस्थिती समजून घेण्यास आणि योग्य निर्णय घेऊन योग्य उपाय शोधण्यास मदत करते.

### शक्तीवर नियंत्रण ठेवायला हवे

सत्तेचा गैरवापर आपल्याला नष्ट करू शकतो. गणेशजींची सोंड वाकलेली आहे जी दर्शविते, की गणेशजींचे त्यांच्या शक्तीवर नियंत्रण आहे. आपल्यासाठी हा एक धडा आहे, की शक्ती आपल्या नियंत्रणाखाली असावी आणि त्यांचा योग्य वापर करावा.

### क्षमा भावना

एकदा गणेशजींना मेजवानीला बोलावण्यात आले आणि त्यांनी अधिक खाल्ले. परत येताना चंद्राने त्यांच्या फुगलेल्या पोटाची खिल्ली उडविली. यावर गणेशजींनी त्याला अदृश्य होण्याचा शाप दिला. चंद्राला त्याची चूक कळली आणि त्याने माफी मागितली. गणेशजींनी लगेच त्याला क्षमा केले आणि सांगितले, की तुम्ही दररोज थोडे–थोडे लपाल आणि महिन्यातून फक्त एक दिवस अदृश्य व्हाल. अशाप्रकारे आपण बुद्धीची देवता गणेशजी यांच्याकडून क्षमा करण्यास शिकतो.

### मानवता आणि सन्मानाची भावना

इतरांबद्दल आदर त्यांच्या स्वारीमध्ये दिसून येते. ते एका लहान उंदरावर स्वार होतात. यावरून असे दिसून येते, की भगवान श्री गणेश अगदी लहान प्राण्यांचाही आदर करतात. हे आपल्याला सर्वांना आत्मसात करण्यासाठी आणि त्यांचा आदर करण्यास प्रेरित करतात. असे केल्यानेच आपल्याला जीवनात आदरणीय स्थान मिळू शकते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**